दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
• वर्ष १६ वे • अंक ३२३ • MAHMAR/2006/17212 • रायगड • गुरुवार दि.१७ फेब्रुवारी २०२२ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

मुंबई ते बेलापूर आता प्रवास होणार फक्त ३० मिनिटांत

आजपासून वॉटर टॅक्सी सेवा होणार सुरु

दै.रायगड नगरी । नवी मुंबई

आजपासून बेलापूर ते भाऊचा धक्का जलवा-हतूक सेवा सुरु होणार आहे. याचे उद्घाटन महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते तसेच बेलापूर टॅक्सी सेवेचे ध्वजांकन जलवाहतूक केंद्रीय मंत्री सर्बानंद सोनोवाल यांच्या शुभहस्ते गुरुवार दि. १७ फ्रेब्रुवारी २०२२ रोजी सेक्टर १५, सीबीडी बेला-पूर, बेलापूर जेट्टी येथे दुपारी १२:०० वा. करण्यात येणार आहे. तसेच या कार्यक्रमासाठी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, नगरविकास मंत्री तथा ठाणे जिल्हा पालकमंत्री एकनाथजी शिंदे, मत्स्य व्यवसाय विभागाचे मंत्री अस्लम शेख, व राज्य मंत्री अब्दुल सत्तार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे.

खासदार राजन विचारे यांच्या पाठपुराव्याने नवी मुंबईतील बेलापूर जेट्टीचे काम मार्गी लावण्यात त्यांना यश आले असून महाराष्ट्र मेरी टाईम बोर्डामार्फत केंद्र व राज्य शासनाच्या मदतीने सेक्टर १५, सीबीडी बेलापूर येथे जेट्टीचे सन २०१८ साली केंद्र शासनाच्या सागरमाला योजनेंतर्गत मंजुरी मिळवून काम सुरु केले होते. परंतु या कामामध्ये अनेक अडचणींना सामोरे जावे लागले. जानेवारी २०१९ ला पर्यावरण खात्याची मान्यता मिळाल्यानंतर या जेट्टीच्या कामाला सुरुवात करण्यात आली. या जेट्टीच्या बांधकामासाठी केंद्रशासन ५०% व राज्य शासन ५०% असे एकूण ८.३७ कोटी खर्च करण्यात आलेले आहे. सदर जेट्टी ही एल टाईप मध्ये आहे. त्याची लांबी ७१द१० पाण्यात उतरणारी जेट्टी हि ५५द१० अशी असणार आहे. तसेच या ठिकाणी पार्किंग सुविधा ही उपलब्ध करण्यात आलेली आहे. या जेट्टी मुळे नवी मुंबईत येणाऱ्या पर्यटकांसाठी पॅसेंजर बोट व वॉटर टॅक्सी ची सेवा देण्यात येणार आहे. बेलापूर येथून प्रत्येकी १० ते ३० प्रवासी क्षमता असलेल्या ७ स्पीड बोटी आणि ५६ प्रवासी क्षमता असलेली कॅटामरान बोट अशा एकूण ८ बोटी द्वारे वॉटर टॅक्सी सेवा सुरु करण्यात येणार आहे. बेलापूर ते भाऊचा धक्का येथे पोहोचण्यास ३० मिनिट व कॅटामरान बोटने ४५ ते ५० मिनिट इतका कालावधी लागणार आहे. स्पीड बोट प्रति प्रवाशी भाडे ८०० ते १२०० रुपये पर्यंत असणार आहे. आणि कॅटामरान बोटी करिता प्रति प्रवाशी २९० इतके भाडे आकारण्यात येणार आहे. बेलापूर येथून भाऊच्या धक्क्याबरोबर एलिफंटा व जे एन पि टी या मार्गावर सुद्धा जलवाहतूक सेवा सुरु राहणार आहे. या जलवाहतूक मार्गामुळे नवी मुंबई मध्ये येणाऱ्या पर्यटकांची संख्या वाढणार आहे. तसेच नवी मुंबईमध्ये होणाऱ्या नवीन विमानतळासाठी जोडणी मिळणार आहे.

नवीन पनवेलमध्ये धोकादायक इमारतींच्या पुनर्विकासाचा मार्ग मोकळा

पनवेल महानगरपालिकेचा मोठा निर्णय

दै.रायगड नगरी । पनवेल

सिडकोने बांधलेल्या नवीन पनवेल मधील इमारतींची अवस्था बिकट झाल्याने त्या इमारतींचा पुनर्विकास करण्याच्या मागणीला यश आले आहे. माजी नगराध्यक्ष संदीप पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर, नगरसेवक अनिल भगत यांच्या सोबतीने या संदर्भात पाठपुरावा केला होता. त्याची दखल घेत महापालिकेने आदेश दिले आहेत, त्यामुळे सिडकोच्या इमारतींच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला आहे. विशेषतः प्रथमच असा निर्णय महापालिकेने घेतला असल्याने रहिवाशांना फार मोठा दिलासा मिळाला असून पाठपुराव्याला मोठे यश मिळाले आहे.

या संदर्भात महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी आदेश दिले असून आदेशाची प्रत देण्यात आली. यावेळी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगर-सेवक अनिल भगत, नगरसेवक नितीन पाटील, नगरसेवक हरेश केणी, नगरसेवक बबन मुकादम आणि असोसिएशनचे पदाधिकारी उपस्थित होते.

नवीन पनवेल वसाहतीत बांधण्यात आलेल्या सिडको इमारतींच्या बांधकामाच्या दर्जाबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. इमारती जीर्ण झाल्याने स्लॅब कोसळण्यापासून तर प्लास्टर निघणे यासारख्या असंख्य घटना घडल्या आहेत. त्यामुळे नवीन पनवेल मधील सेक्टर १७ मधील पीएल ६ अपार्टमेंट असोसिएशन बिल्डिंग क्रमांक ०९ ते १५ आणि २१ ते २३ या १० रहिवासी इमारती धोकादायक झाल्याने या इमारतींचा विकास करणे अत्यंत गरजेचे होते. सिडको सातत्याने दुर्लक्ष करत असल्याने त्या अनुषंगाने सातत्याने पाठपुरावा करणे महत्वपूर्ण होते. त्यामुळे भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदशनाखाली पाठपुरावा केला. त्यानुसार या धोकादायक इमारतींची पाहणी करून प्रस्ताव तयार करण्यात आला. सदर प्रस्तावासोबत संरचना अभियंता यांचा अहवाल सादर झाला. अहवालानुसार एकूण या १० इमारती (एकूण १२० सदनिका) संरचनात्मकदृष्टया धोकादायकअसून त्या डागडुगी किंवा दुरुस्ती करण्याच्या पलीकडे असल्याने व त्या मानवी वास्तव्याच्या दृष्टीने धोकादायक असल्याने पनवेल महानगरपालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांनी धोकादायक म्हणून घोषित केल्या आहेत आणि तसे आदेश त्यांनी पत्राद्वारे दिले आहेत. त्यामुळे सिडकोच्या इमारतींच्या पुनर्वसनाचा मार्ग मोकळा झाला असून हा एक ऐतिहासिक निर्णय झाला आहे. याकामी मार्गदर्शन केल्याबद्दल आमदार प्रशांत ठाकूर, तसेच आयुक्त गणेश देशमुख, पाठपुरावा केल्याबद्दल सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, नगरसेवक अनिल भगत आणि सहकाऱ्यांचे रहिवाशांनी आभार व्यक्त केले.

पुलावरून दुचाकी कोसळल्याने ओंकार मस्केचा दुर्दैवी अंत

पनवेल तालुक्यातील चिपळे गावाजवळ पहाटे झाला अपघात

दै.रायगड नगरी । पनवेल

रस्ते अपघात अनेकांच्या जिव्हारी लागत असल्याच्या दुर्दैवी घटना सातत्याने घडत असतानाच पनवेल माथेरान मार्गावर झालेल्या अपघातात एका २४ वर्षीय युवकाने आ-पला जीव गमावलाय. चिपळे पुलाजवळील खड्ड्यात दुचाकी कोसळल्याने विहिघर, महालक्ष्मी येथील ओमकार पोपट मस्के या दुचाकीस्वाराचा करुण अंत झाला.

या अपघातात ओंकारसोबत असलेला आकाश सुनील तुराई हा १९ वर्षीय युवक जखमी झाला आहे. १६ फेब्रुवारी रोजी ओंकार आणि आकाश हे पनवेल वरून विहिघर, महालक्ष्मी येथे आपल्या घरी परत जात असताना पहाटे ३ च्या सुमारास हा अपघात घडला. अपघात इतका भयानक होता कि ओंकार मस्के या तरुणाचा जागीच मृत्यू झाला तर जखमी आकाश तुरे याला खांदा कॉलनी येथील अष्टविनायक हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे. या अपघाताचा अधिक तपास खांदेश्वर पोलीस करीत आहेत.

जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांचे साडेबारा टक्केचे वितरण करून तात्काळ ताबा द्यावा

दै.रायगड नगरी । उरण

जेएनपीटीने न्हावाशेवा बंदर उभारणीसाठी संपादित करण्यात आलेल्या जमीनीचे विकसित साडेबारा टक्के भूखंड देण्याचे मंजूर केल्याबद्दल प्रकल्पग्रस्तांच्या वतीने जेएनपीटी प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत. या संबंधीचा निर्णय होऊन १० वर्षे लोटली असली तरी, प्रत्यक्षात या प्रकल्पग्रस्तांना साडेबारा टक्के भूखंडाचे वाटप होण्यासासाठी सदरचे भूखंड विकसित करून त्याचा ताबा मिळालेला नाही. त्यामुळे येथील शेतकऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात असंतोष निर्माण झाला आहे.

१९८४ ला सदर जमिनीचे अवार्ड झालेले असल्याने ज्या शेतकऱ्यांच्या नावे हे अवार्ड झालेले आहेत. ते हयात नाहीत तसेच त्यांचे वारस सुद्धा सध्या वृद्धापकाळाकडे झुकलेले आहेत. परिणामी साडेबारा टक्के भूखंडाच्या लाभापासून ते वंचित होत आहेत. त्यामुळे अखिल भारतीय किसान सभा रायगड जिल्हा समितीच्या वतीने मागणी करण्यात येत आहे की, जेएनपीटी प्रकल्पग्रस्तांना तातडीने साडेबारा टक्के भूखंडाचे वितरण होऊन त्याचा ताबा शेतकाऱ्यांना लवकरात लवकर द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

संक्षिप्त...

सरकार पाडण्याचे भाजपचे स्वप्न पूर्ण होणार नाही : बाळासाहेब थोरात

दै.रायगड नगरी । मुंबई

केंद्रात भाजपचे सरकार आल्यापासून सातत्याने केंद्रीय तपास यंत्रणांचा वापर करून विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर करण्याचे काम सुरु आहे, हे लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. महाराष्ट्रातही गेल्या दोन वर्षापासून सातत्याने केंद्रीय यंत्रणाचा गैरवापर करून सरकार अस्थिर करण्याचे व महाराष्ट्राला बदनाम करण्याचे षडयंत्र सुरु आहे पण आम्ही सर्वजण एकजुटीने ही लढाई लढत आहोत. महाविकास आघाडी सरकार पाडण्याचे भाजपचे स्वप्न पूर्ण होणार नाही, अशी टीका विधिमंडळ काँग्रेस पक्ष नेते तथा महसूलमंत्री बाळासाहेब थोरात यांनी केली आहे.

या संदर्भात बोलताना थोरात म्हणाले की, २०१४ नंतर देशातील लोकशाही, संविधान धाब्यावर बसवून सीबीआय, ईडी, इन्कम टॅक्सच्या मदतीने लोकनियुक्त सरकारे अस्थिर करण्याचे कारस्थान भाजपकडून सुरु आहे. महाराष्ट्रातील महाविकास आघाडीचे सरकार पाडण्यासाठी भाजपचे नेते दररोज नवनवी कारस्थाने करत असतात पण आम्ही सर्व एकजूट आहोत. शिवसेना खासदार संजय राऊत यांनी काल केंद्रीय तपास यंत्रणांच्या गैरवापराबाबत सत्यस्थिती मांडली आहे. आम्ही सर्व राऊत यांच्यासोबत आहोत.

दिघी - माणगाव मार्गावरील घाट धोकादायक

घोणसे व म्हसळा बायपास घाटांत १५ दिवसांत सहा अपघात

दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे

दिघी : दिघी ते पुणे या राष्ट्रीय महामार्गावरील माणगाव - म्हसळा रस्त्यावर घोणसे, मोर्बा व म्हसळा बायपास घाटातील वळण धोकादायक ठरत असून, या वळणावर संरक्षण कठडे व दिशादर्शक फलक बसवावे अशी मागणी वाहन चालकांकडून होत आहे. एका फेब्रुवारी महिन्यात या घाटांत सहा अवजड वाहनांचे अपघात घडले आहेत. सुदैवाने यात कुणी मृत नाही मात्र, वाहनांचे मोठे नुकसान झाले आहे.

संरक्षक कठडे व दिशादर्शक फलक नसल्यामुळे घाटातील वळण धोकादायक बनले आहे. वाहनधारकांना वळणाचा अंदाज येत नसल्याने अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे. माणगाव कडून म्हसळा कडे येण्यासाठी उतार असल्याने वाहनांचा वेग अधिक असतो, तर दिघी - म्हसळा कडून माणगाव कडे जाण-ारी वाहने चढ असल्याने हळू असतात. माणगाव कडून येणारी वाहने वळणावर संरक्षक कठडे नसल्याने सरळ दरीत जाण्याची शक्यता आहे. या अगोदर देखील दोन्ही घाटात अनेकांना जीव गमवावा लागला आहे. वळणाचा अंदाज येत नसल्याने अनेक वाहने घाटाच्या खाली गेली आहेत. स्थानिक लोकप्रतिनिधींनी लक्ष देऊन घाटातील अपघाती वळणावर संरक्षक कठडे व दिशादर्शक फलक बसवावे अशी मागणी करण्यात आली आहे.

श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटन स्थळांमुळे श्रीवर्धन कडे जाणाऱ्या पर्यटकांच्या वाहनांची मोठी वर्दळ माणगाव - श्रीवर्धन किंवा दिवेआगर मार्गावर असते. याशिवाय

.../२

कर्जत उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता

दै.रायगड नगरी । कर्जत

कर्जत उपअधिक्षक भुमी अभिलेख कार्यालयात कर्मचारी यांची कमतरता असल्याने जवळपास पाचशे मोजणी अर्ज गेले तीन महिन्यापासून प्रलंबित असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागत आहे. फक्त दोन सर्व्हे कर्मचारी कर्जत कार्यालयात सध्या कार्यरत असून एकूण सात जागा रिक्त असल्याने मोजणी अर्जाचा डोंगर झाला असून कामे होत नसल्याने या कार्यालयात रोजच बाचाबाची होण्याचा प्रसंग होत आहे.

कर्जत उपअधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयातून संपूर्ण तालुक्याचा मोजणी अथवा शेत जमिनी संदर्भात कामे केली जातात. तालुक्याचा विस्तार खूप मोठा असल्याने या कार्यालयात मोजणी चे दर महिन्याला साधारणतः दीडशे अर्ज तरी येत असतात. तसेच नक्कल प्रत काढण्यासाठी साधारण दोनशे अर्ज येतात मात्र गेल्या तीन चार महिन्यापासून या कार्यालयातून अर्जाचा निपटारा न झाल्याने आजच्या तारखेस एकूण पाचशे अर्ज मोजणी कामाचे प्रलंबित असून तेवढेच अर्ज नक्कल साठी प्रलंबित आहेत. यामुळे या कार्यालयात येणाऱ्या शेतकऱ्यांना नुसत्या फेऱ्या मारावे लागत असून त्यांची कामेच होत नसल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. रोज या कार्यालयात कर्मचारी आणि शेतकरी यांच्या बाचाबाची, खटके उडत आहेत. ग्रामीण भागातून

.../२

ढोकशेत धरण क्षेत्रात अनधिकृत उत्खनन भराव व बांधकाम

महसूल विभागाचा २ कोटी ३६ लाख दंड पाटबंधारे विभागाची नोटीस

दै.रायगड नगरी । गौसखान पठाण

सुधागड / पाली : सुधागड तालुक्यातील ढोकशेत धरण क्षेत्रात एका खाजगी विकसकाने अनधिकृत उत्खनन व बांधकाम केले आहे. या बरोबरच धरणामध्ये भराव देखील केला आहे. यामुळे धरणातील पाणी जाण्याचा मार्ग देखील बंद झाला आहे. यासंदर्भात सुधागड पाली महसूल विभागाने विकासकावर २ कोटी ३६ लाख ६४ हजार ६२० रुपयांचा दंड ठोठावला आहे. तर पाटबंधारे विभागाने देखील धरणात केलेला भराव काढण्यासाठी नोटीस बजावली आहे.

धरण क्षेत्रातील अनधिकृत उत्खनन, भराव व बांधकामाविषयी सामाजिक कार्यकर्ते सागर मिसाळ यांनी सुधागड महसूल विभाग व पाटबंधारे विभाग कोलाड येथे तक्रार दाखल केली आहे. त्यानुसार ही कारवाई झाली आहे. सागर मिसाळ यांनी दिलेल्या तक्रारी निवेदनात म्हटले आहे की ढोकशेत गट सर्व्हे नंबर ४३२ मध्ये शेत घर बांधण्याचे काम सुरू असून सपाटीकरणाच्या नावाखाली अनधिकृत उत्खनन करण्यात आले आहे. ही जागा ढोकशेत धरणाला लागून असल्याने ढोकशेत धरणामध्ये अनधिकृतरित्या भराव करण्यात आला आहे. तसेच धरणामधून बाहेर जाणार पाण्याचा

.../२

शिवसेनेकडून शेट तर राष्ट्रवादीकडून निंबाळकर स्वीकृत नगरसेवक नियुक्त

दै.रायगड नगरी । उतेखोल/माणगाव

आज दि. १६ फेब्रुवारीला माणगांव नगरपंचायतीच्या सभेत नगर सेवकांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. शिवसेना गटाकडुन हेमंत शेठ तर राष्ट्रवादी काँग्रेस कडून बाबुराव निंबाळकर यांना स्वीकृत नगरसेवक म्हणून घोषित करण्यात आले. माणगांवकरांकडुन सोशल माध्यमांवर तसेच प्रत्यक्ष भेटुन नवनिर्वाचीत स्वीकृत नगर सेवकांचे अभिनंदन केले जात आहे.

स्वीकृत नगरसेवक म्हणजे नेमके काय? हे जाणुन घेण्याची अनेकांना उत्सुकता असते, जे प्रत्यक्ष निवडणुकीने निवडून न येता विशेष बाब म्हणून त्यांना नगरसेवक पद बहाल केले जाते त्यास स्वीकृत नगर-सेवक असे सर्वसाधारण पणे म्हणतात. थोडक्यात सांगायचे झाले तर स्वीकृत नगरसेवक पद का भेटते? याबाबतच्या माहिती नुसार, विविध क्षेत्रांतील तज्ज्ञ पालिकेच्या सभागृहात असावेत, या उद्देशाने स्वीकृत नगरसेवक निवडीची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, बऱ्याचदा तज्ज्ञांची निवड न करता राजकीय सोय लावली जाते असे म्हणतात, निवडणुकां मध्ये पराभूत झालेले किंवा तिकीट नाकारले गेल्याने नाराज झालेल्या राजकीय पुढाऱ्यांची वर्णी या पदांवर लावण्याची परंपरा आहे. नगरसेवका प्रमाणेच स्वीकृत नगर सेवकाचे अधिकार असतात, मतदान सोडून बाकी सर्व अधिकार, निवडणुकीत निवडून आलेल्या नगरसेवका प्रमाणेच असतात. अशी माहीती राजकीय आखाड्यातून ऐकावयास मिळते.

म्हसळा नगर पंचायतीत राष्ट्रवादीचे दोन स्वीकृत नगरसेवक आणि पाच विषय समिती सभापती पदाची निवड

काँग्रेस, सेना गटबंधनाने घेतला कठोर निर्णय ? विषय समितीत सहभागी न होता स्वीकारली अलिप्तता

दै.रायगड नगरी । म्हसळा

राष्ट्रवादी काँग्रेसची एक हाती सत्ता असलेल्या म्हसळा नगर पंचयतीवर खासदार सुनिल तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे यांचे आदेशानुसार माजी नगरसेवक करण गायकवाड आणि अंजुमन इस्लाम जंजिरा हायस्कूल म्हसळाचे चेअरमन नासिर मिठागरे यांची स्वीकृत नगरसेवक पदावर निवड झाली. त्याच बरोबर उपनगराध्यक्ष यांचे सह राष्ट्रवादीचे ४ नगरसेवकांना विविध विषय समितीचे सभापती पद देवुन समिती गठन करण्यात आले आहे.

उपनगराध्यक्ष सुनिल शेडगे यांच्याकडे सार्वजनिक बांधकाम तर अनुभवी नगरसेवक गट नेते संजय कर्णिक यांच्याकडे पाणी पुरवठा व जळणीसारण समितीचा कारभार देण्यात आला आहे. दुसरे अनुभवी नगरसेवक संजय दिवेकर यांच्याकडे स्वच्छता व वैधक आरोग्य समिती सभापती पदी नियुक्ती करण्यात आली आहे, नियोजन व पर्यटन समिती सभापतीपदावर नगरसेविका सरोज मंगेश म्हशीलकर यांची वर्णी लागली आहे. महिला व बाळकल्याण समितीचे सभापती सुमैया कासीम आमदानी यांची तर उपसभापती पदासाठी कमळ रविंद्र जाधव यांची निवड झाली आहे. विषय समितीत राष्ट्रवादीचे अन्य तीन सदस्यांची नेमणूक करण्यात आली आहे. विषय समिती मध्ये नियमानुसार विरोधी पक्षांचे सदस्यांना सामावुन घेतले जाते परंतु संख्या बळाचे अभावाने सभापती पद मिळत नसल्याने काँग्रेस आणि शिवसेना गोटात अस्वस्थता आहे. त्याचाच परिणाम म्हणून काँग्रेस,शिवसेना गटबंधन नगरसेवकांनी विषय समितीमध्ये सहभागी न होता पूर्णपणे अलिप्त राहण्याचा निर्णय घेतला असल्याचे समितीचे गठन झालेवरून दिसून येत आहे. नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवक आणि विषय समिती सभापती निवड प्रकिया पार पाडण्यासाठी निवडणूक पीठासीन अधिकारी तथा प्रांताधिकारी अमित शेडगे यांनी कामकाज पाहिले त्यांना या कामी मुख्याधिकारी मनोज उकिर्डे यांनी सहकार्य केले. म्हसळा नगर पंचयतीमध्ये १७ पैकी १३ नगर-सेवक राष्ट्रवादीचे तर दोन शिवसेना आणि दोन काँग्रेस असे सदस्य संख्याबळ आहे. बहुमतात असलेल्या राष्ट्रवादीचे दोन स्वीकृत नगरसेवक विराजमान झाले आहेत. खासदार सुनिल तटकरे, आमदार अनिकेत तटकरे यांनी शहराचे विकासात सर्व समावेशक प्राधान्य व संधी देत स्वीकृत नगर सेवकांची नेमणूक केली आहे. सर्व नवनिर्वाचित विषय समिती सभापती व सदस्यांचे राष्ट्रवादी काँग्रेस तालुका अध्यक्ष समीर बनकर यांचेसह पक्षाचे सर्व पदाधिकारी यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

स्वीकृत नगर सेवकांच्या नामनिर्देशन पत्रावर विरोधी पक्ष नेते डॉ.मुईज शेख यांनी पीठासीन अधिकारी अमित शेडगे यांचे कडे जोरदार आक्षेप घेतला होता. नवनिर्वाचित नगरसेवक नासिर मिठागरे आणि नगरसेवक करण गायकवाड यांनी सादर केलेले अशासकीय संघटनेचे रजिस्ट्रेशन (बॉम्बे पब्लिक ऍक्ट) मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० नुसार रजिस्ट्रेशन आहे की नाही त्या बाबत आक्षेप नोंदवला असता. स्वीकृत नगरसेवक यांनी नामनिर्देशन पत्र सादर करतेवेळी अशासकीय संघटनेचे जोडलेले शिफारस पत्र हे संबंधित अध्यक्ष यांचे सहीचे व रजिस्ट्रेशन नंबर नमुद केलेले असल्याने स्वीकृत नगरसेवकांची नेमणूक वैध ठरत असल्याचा निकाल पीठासीन अधिकारी अमित शेडगे यांनी जाहीर केला. या साठी गटनेते संजय कर्णिक यांनी बाजु मांडून आक्षेप घेतला आहे तर विरोधी पक्षनेते यांचे कडे पुरावा नसल्याने आक्षेप फेटाळून लावण्यात आला.

सुधागड (पाली) येथील आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह इमारत बांधकामाच्या रकमेस शासनाची प्रशासकीय मान्यता प्रदान

दै.रायगड नगरी । अलिबाग

जिल्ह्यातील सुधागड-पाली तालुक्यातील मौजे जांभूळपाडा येथे आदिम जमाती (झतढ्ऋ) (कातकरी) यांच्याकरिता बहुद्देशीय संकुल उभारण्यासाठी उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्याकडे पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने उपमुख्यमंत्री महोदयांनी २०२१ च्या अर्थसंकल्पात रायगड जिल्ह्यातील आदिम जमातीसाठी बहुउद्देशीय संकुल उभारण्याची घोषणा केली होती. त्यानुषंगाने आता शासनाने हे संकुल उभारण्यासाठी १२ कोटी ५० लक्ष रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचेच हे फलित आहे.

राज्य शासनाची मान्यताप्राप्त असलेल्या या बहुउद्देशीय संकुलासाठी मौजे जांभूळपाडा, ता. सुधागड येथील सुमारे ५० एकर शासकीय जागा निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार आदिवासी विकास विभागाने या बहुउद्देशीय संकुलाच्या प्राथमिक प्रारुप आराखड्यास तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली होती. या आराखड्यानुसार १ हजार विद्यार्थ्यांसाठी निवासी शाळा १ ली ते १२ वी, ५०० मुलांच्या राहण्याची क्षमता असलेले वसतिगृह, ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय, २०० खाटांचे बहुउद्देशीय रुग्णालय, ५०० लोकांच्या क्षमतेचे सभागृह, तंत्रशिक्षण- कौशल्य विकास, १ हजार मे.टन क्षमतेचे साठवणूक गोदाम, २०० कर्मचारी निवासस्थाने, शेती व शेळीपालनासाठी कृषी कौशल्य विकास केंद्र, वनधन प्रक्रिया केंद्र, बागबगीचा-खेळ मैदाने, संरक्षक भिंत, पाणीपुरवठा, विद्युतीकरण, सोलार संयंत्रे, मलनि:स्सारण केंद्र, वाहनतळ, संकुलासाठी अंतर्गत रस्ते व इतर सुविधांसह आदिवासी निर्मित वस्तूंचे प्रदर्शन केंद्र आदी विविध सुविधांचा समावेश यामध्ये आहे.

खांदा वसाहत नवीन शिवसेना पदाधिकारी जाहीर

दै.रायगड नगरी । पनवेल

शिवसेना पक्षप्रमुख कथा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना नेते व संपर्क नेते कोंकण विभाग तथा महाराष्ट्र राज्याचे उद्योग व खनिकर्म मंत्री सुभाष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली व तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख रायगड शिरीष घरत यांच्या नेतृत्वाखाली शिवसेना खांदा वसाहत येथील रामदास गोंधळी यांची उपमहानगर प्रमुख पदी, शिवाजी दांगट यांची उप महानगर संघटक पदी व गणेश परब यांची खांदाकॉलनी शहर समन्वयक पदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी शिवसेना पनवेल महानगर प्रमुख रामदास शेवाळे, तालुका संपर्क प्रमुख योगेश तांडेल, उपमहानगर प्रमुख दिपक घरत व खांदा कॉलनी शहर प्रमुख सदानंद शिर्के आदी पदाधिकारी उपस्थित होते.

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे : धामोते, ता.कर्जत, जि.रायगड येथील मिळकतीचे मालक श्री.राजाराम एम. कांदळगावकर यांची सदर खालील प्रमाणे वर्णन केलेली बिनशेती मिळकत विकत घेण्याचे ठरविलेले आहे.

सर्व्हे नं.	प्लॉट नं.	क्षेत्र चौ.मी.	आकार रु.पै.
८९	५	२८०-००	२८-००

सबब सदरबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांच्याकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दि.१४/०२/२०२२

सही/-
ॲड.शिवाजी किसन टोकरे
शॉप नं.९, समर्थ कृपा हौसिंग
सोसायटी नेरळ, महेश टॉकीज
जवळ, नेरळ, ता.कर्जत, जि.रायगड
पिन कोड नं.४१०१०१
फोन नं.७३५०१९४२००

मे.पांडे साहेब यांच्या कोर्टात

अर्जदाराचे वकील
ॲड.मेहबुब गै. पटेल

जाहीर नोटीस

पनवेल येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी साहेब यांचे कोर्टात

क्रिमिनल चौ.अर्ज क्र.२१०/२०२२
नि.नं.७/ड
ने.ता.१९/०३/२०२२

श्री.इम्तियाज फारुकी
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.उलवे नोड, सेक्टर १९,
ता.पनवेल, जि.रायगड, महाराष्ट्र — अर्जदार

विरुद्ध

मा.ग्रामविकास अधिकारी
जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी
ग्रुप ग्रामपंचायत वहाळ
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

या जाहीर नोटीसीद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार यांची मुलगी कु.उम्मे हबीबा हिचा जन्म दि.२०/०५/२०१९ रोजी मौजे : उलवे नोड, वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथील ओम साई हॉस्पिटल येथे झालेला आहे.

वरील अर्जदार यांची मुलगी कु.उम्मे हबीबा हिचा जन्म दि.२०/०५/२०१९ रोजी वहाळ, उलवे नोड, ता.पनवेल येथे झाला आहे असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदाराने यांनी या मे.कोर्टात जन्मदाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदारांचे जन्माबद्दल कोणासही हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटी प्रसिद्ध झालेपासून १ महिन्याचे आत या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकत घेण्याची आहे. जर या कालावधीमध्ये कोणीही योग्य हरकती घेतल्या नाहीत तर मे.कोर्ट अर्जदार यांना जन्मदाखला देण्याची ताबडतोब कार्यवाही करेल.

आज दि.१६/०२/२०२२ रोजी माझ्या सहीनिशी व मे.कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्या.क.स्तर, पनवेल

जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली शेतजमीन मिळकत त्याचे विद्यमान मालक / कब्जेदार श्री.मनोहर अनाजी मोकल व इतर यांचेकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे.

जमीन मिळकतीचे वर्णन

मौजे : चिरनेर, ता.उरण, जि.रायगड येथील जमीन मिळकत

मौजे	स.नं.	हि.नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
चिरनेर	२६९	२	००.०८.४०	२.०६
			पो.ख. ००.००.२०	
			एकूण ००.०८.६०	

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेच्या साठेकरार विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिपत्र, मृत्यूपत्र, चार्ज, फरोक्त, दावा, वारसाहक्क, लायसन्सी, लिन, टेनन्सी, विल, अन्नवस्त्र, पोटगी, ताबा कब्जा, हवाला, अदला बदल व येणे जाणेसाठी अथवा वहिवाटी वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास किंवा त्याच्या खरेदीखताच्या व्यवहारास हरकत असल्यास संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह लेखी स्वरुपात पोस्टाने किंवा स्वतःहून हजर होवून आमचेकडे ही नोटी प्रसिद्ध झाल्यापासून दहा दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही किंवा असल्यास तो हक्क हितसंबंध त्यांनी आमच्या अशिलांच्या लाभांत सोडून दिला असून त्याची आमच्या अशिलांच्या लाभांत होणाऱ्या खरेदीखतास कोणतीही हरकत नाही असे समजण्यास येवून खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर मागाहून कोणत्याही हरकत घेतल्यास ती हरकत आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

दि.१६/०२/२०२२
स्थळ : उरण

सही/-
ॲड.उदय प्रकाश मोकल
अ-६३, रुम नं.१०, सेक्टर-१,
जेएनपीटी कॉलनी, द्रोणागिरी
नोड, ता.उरण, जि.रायगड
मो.नं.९०८२९११९१३

मा.पांडे साहेब

अॅड.प्रमिला मोरेश्वर ठाकूर / पाटील

जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील फौजदारी न्याया.साहेब, यांच्या कोर्टा समोर

फौ.चौ.अर्ज क्र.१९४/२०२२
ने.ता.१७/०३/२०२२

श्री.ज्ञानेश्वर तुकाराम पाटील
वय : ४०, धंदा : व्यवसाय
मु.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ज्ञानेश्वर तुकाराम पाटील पंजोबा कै.सजन तुकाराम पाटील दि.१५/०९/१९६३ साली मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तसेच अर्जदारास सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केले आहे. सदरील मृत्यूच्या नोंदी संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात हरकत कळवावी. तशी हरकत आली नाही तर सदरील नोंदी संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याची नोंद घेवून पेपर मे.कोर्टात दाखल करण्यात येईल.

पनवेल
दि.१६/०२/२०२२

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

मा.पांडे साहेब

अॅड.प्रमिला मोरेश्वर ठाकूर / पाटील

जाहीर नोटीस

मे.पनवेल येथील फौजदारी न्याया.साहेब, यांच्या कोर्टा समोर

फौ.चौ.अर्ज क्र.१९५/२०२२
ने.ता.१७/०३/२०२२

श्री.ज्ञानेश्वर तुकाराम पाटील
वय : ४०, धंदा : व्यवसाय
मु.तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार ज्ञानेश्वर तुकाराम पाटील आजोबा कै.काथोर सजन पाटील दि.१३/०९/१९६८ साली मौजे : तोंडरे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू झालेला आहे. तसेच अर्जदारास सदरील अर्ज मे.कोर्टात दाखल केले आहे. सदरील मृत्यूच्या नोंदी संदर्भात कोणाचीही कसलीही हरकत असल्यास १५ दिवसात हरकत कळवावी. तशी हरकत आली नाही तर सदरील नोंदी संदर्भात कोणाचीही हरकत नसल्याची नोंद घेवून पेपर मे.कोर्टात दाखल करण्यात येईल.

पनवेल
दि.१६/०२/२०२२

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

पृष्ठ क्र.१ वरुन...

घोणसे व म्हसळा बायपास घाटांत १५ दिवसांत सहा अपघात

दिघी पोर्ट येथील अवजड वाहतूक देखील रात्रभर सुरु असते. ट्रेलर चालक हे परराज्यातील असल्याने त्यांना बऱ्याचदा कोंकणातील वळणदार रस्त्यांचा अंदाज नसतो व अतिवेगात वाहन चालवण्याच्या नादात मोठा अपघात घडतो.

पुणे ते दिघी बंदर पर्यंत च्या दुपदरी महामार्गाचा पाहिला टप्पा म्हणून माणगाव ते दिघी बंदर चे काँक्रीटीकरण सध्या होत आहे. घाट मार्गातील काम पूर्ण झाले मात्र साईड पट्टी व संरक्षण कठडे झाले नसल्याने अपघात होऊ शकतात. याबाबतीत प्रतिक्रिया घेण्यासाठी महाराष्ट्र रस्ते विकास मंडळाचे अभियंता सचिन निफाडे यांच्या संपर्क केला असता मिटिंग मध्ये असल्याचे सांगितले.

कर्जत उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयात कर्मचाऱ्यांची कमतरता

लांबून येणारा शेतकरी शंभर दोनशे रुपये खर्च करून या कार्यालयात आल्या नंतर त्याचे काम होत नसल्याने बऱ्याच वेळा मनस्ताप होवून वाद विवाद होत आहेत.

कर्जत भूमी अभिलेख कार्यालयात सध्या फक्त दोन कर्मचारी मोजणी कामासाठी नियुक्त असून त्यातील एकवार छाननी लिपिक तसेच आवक -जावकची सुद्धा जबाबदारी दिली असल्याने फक्त एकच कर्मचारी मोजणी कामासाठी जात असल्याने एकूण पाचशे मोजणी चे प्रकरणे प्रलंबित राहिली आहेत. पूर्वी या कार्यालयात एकूण नऊ मोजणी कर्मचारी नियुक्त होते. परंतु कोणाची बदली तर कोण निवृत्त झाल्याने ही पदे अनेक महिन्यापासून रिक्त असल्याने या अडचणी निर्माण झाल्या आहेत. त्यात या कार्यालयात दोन महिन्यापूर्वी लाचलुचपत कार्यालयाने कारवाई करून छाननी लिपिक जाधव याला लाच घेताना अटक केली होती. त्यामुळे अनेक कर्मचारी आणि उपअधीक्षक कारवाई च्या भीतीने बरेच दिवस कार्यालयात येतच नव्हते. कार्यालयात कामे होत नसल्याने शेतकरी वर्ग मात्र नाराज आहे.

ढोकशेत धरण क्षेत्रात अनधिकृत उत्खनन भराव व बांधकाम

प्रवाह देखील मातीचा भराव करून बुजवण्यात आला आहे व कच्चा मार्ग करण्यात आला आहे. ही जागा पाटबंधारे विभाग यांच्या अधिकाराखाली असतांना तेथे अशा प्रकारे अनधिकृत भराव होत असूनही पाटबंधारे विभागाचे दुर्लक्ष होत आहे. असे निवेदनात म्हटले आहे. याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून स्थळ पाहणी करण्यात यावी असे म्हटले आहे. तसेच काही ठिकाणी वृक्ष तोड झाल्याने वन विभागाने देखील येथे लक्ष द्यावे. या अनधिकृत उत्खलनासाठी महसूल विभागाने जवळपास २ कोटी ३६ लाख रुपये दंडाची नोटीस पाठवली आहे. मात्र सुधागड महसूल विभागाच्या माध्यमातून किती दंड वसुली झाली याचीही चौकशी व तपासणी करण्याची विनंती निवेदनात केली आहे.

सिडको
शहरांचे शिल्पकार

जाहीर सूचना

सिडको महामंडळाने नेरुळ उरण रेल्वे प्रकल्पाकरिता मौजे-जासई, ता. उरण व मौजे-गव्हाण, ता. पनवेल या गावातील जमिनी संपादित केलेल्या आहेत. सदर प्रकल्पामध्ये बाधित होणाऱ्या भुधारकांस भूखंड वाटप करणे प्रस्तावित आहे. खालील भूधारकांस आवश्यक दस्तऐवजांची पुर्तता न केल्याने भुखंड वाटप प्रलंबित आहे.

नेरुळ उरण रेल्वे				
अ. क्र.	पात्र खातेदाराचे नाव	गावाचे नाव	शेतजमीनखालील संपादित जमीनीचा तपशील	
			स. नं./गट नं.	७/१२ नुसार एकुण क्षेत्र (हे आर)
१	मनोहर सीताराम देशमुख व इतर	गव्हाण	२६७/८	०-५५-१
२	विठ्ठल महादेव देशमुख व इतर	गव्हाण	२९०/१ २८८/२ २८८/३ ३८३/५	०-१९-७ ०-३२-४ ०-१२-० ०-५८-०
३	हरिश्चंद्र नारायण देशमुख व इतर	गव्हाण	२६८/५	०-२०-८
४	शेखर कृष्णाजी देशमुख व इतर	गव्हाण	२७०/१	०-४७-०
५	अमृत आबा घरत	जासई	१८६/३	०-०९-०
६	नामदेव राजराम देशमुख व इतर	गव्हाण	३६२/५ २७१/११	०-१२-० ०-०२-५
७	चंद्रभागा गजानन देशमुख व इतर	गव्हाण	२७२/३क/१	०-०९-४
८	चंद्रभागा गजानन देशमुख व इतर	गव्हाण	२७२/३क/२	०-०८-९
९	शरद गोपाळ देशमुख व इतर	गव्हाण	३६१/१	०-३३-९
१०	हिराबाई काशिनाथ देशमुख व इतर	गव्हाण	२७६/३	०-२३-८
११	विलास जगन्नाथ देशमुख व इतर	गव्हाण	२६७/१ अ	०-७७-०

उपरोक्त भुधारकांना भुखंड वाटप होणे कामी आवश्यक ते दस्तऐवज सादर करणेकामी कळविण्यात आले होते. परंतु सदर दस्तऐवज अद्यापपर्यंत संबंधित भुधारकांनी खाली नमूद केल्यापैकी काही कागदपत्रे सादर केली नाहीत.

तरी संबंधित भूधारकांस विनंती करण्यात येते की, खाली नमूद दस्तऐवजांची पूर्तता तात्काळ करावी. त्यानंतर भुखंडाचे वाटपाची कार्यवाही करण्यात येईल.

सादर करावयाचे दस्तऐवज :-

१. सर्व भूधारकांच्या स्वाक्षरीसह संमतीपत्र.
२. २२.५% भुखंड वाटपासाठी संबंधित भूधारकाच्या स्वाक्षरीसह अर्ज
३. ताबे पावतीच्या साक्षांकित प्रती
४. संबधित तलाठी कार्यालयाने प्रमाणित केलेला ७/१२ उतारा
५. आधारकार्ड, पॅन कार्ड, रेशनकार्ड, रहिवाशी दाखला
६. हमीपत्र (१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर)
७. बंधपत्र (१०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर)
८. भूधारक मयत असल्यास वारस दाखला,वारसांचे प्रतिज्ञापत्र.

अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**
भूसंपादन विभाग, १ ला मजला, सिडको भवन,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४

अप्पर जिल्हाधिकारी तथा
मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/४३०/२०२१-२२

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

लाईफ केअर डेग्नोस्टिक वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबीर

दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे

माथेरान : युवक्रांती पोलीस मित्र संघटना तसेच लाईफ केअर डेग्नोस्टिक यांच्या तर्फे माथेरान पोलीस स्टेशन मध्ये मोफत रक्त व इतर तपासणी ठेवण्यात आल्या या प्रसंगी माथेरान मधील सहायक पोलीस निरीक्षक शेखर लव्हे सर्व पोलीस अधिकारी तसेच बाकी इतर सरकारी कर्मचारी व सफाई कामगार यांचे मोफत तपासणी करण्यात आल्या. या प्रसंगी पोलीस मित्र संघटनेचे रायगड जिल्हाध्यक्ष प्रितेश बोंबे माथेरान शहर अध्यक्ष सतीश बर्गे व पोलीस मित्र संघटने माथेरानचे सदस्य व लाईफ केअर डेग्नोस्टिकचे सुशांत पाटील हे उपस्थित होते.

विविध खात्यातील अधिकारी वर्गाला शासकीय कामातून अनेकदा आजार उद्भवतात.अत्यंत इमानेइतबारे कर्तव्य पार पाडत असताना या कामाच्या व्यापात त्यांचे आरोग्याकडे दुर्लक्ष होत असते.

याकामी युवक्रांती पोलीस मित्र संघटना तसेच लाईफ केअर डेग्नोस्टिक यांच्या तर्फे माथेरान पोलीस स्टेशन परिसरात मोफत रक्त व इतर तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते त्यास सर्व शासकीय अधिकारी कर्मचारी वर्गाने उत्स्फूर्त पणे प्रतिसाद देत हे आरोग्य शिबीर यशस्वीपणे पार पाडले यासाठी माथेरान शहर अध्यक्ष सतीश बर्गे यांच्या सह संबंधित सहकार्यानी विशेष परिश्रम घेतले.

काटेरी बोरीच्या झाडाखाली आढळला मृतदेह

दै.रायगड नगरी । पनवेल

काटेरी बोरीच्या झाडाखाली एका महिलेचा मृतदेह आढळून आला असून तिच्या नातेवाईकांचा शोध खारघर पोलिस करीत आहेत.

खारघर रेल्वे स्टेशन ते सिबीडी रेल्वे स्टेशन दरम्यान पोल क्र.- ३९/२० पासून १० फूट अंतरावर असलेल्या काटेरी बोरीच्या झाडाखाली एका ३५ ते ४० वर्षीय महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. महिलेची उंची अंदाजे ५ फूट, अंगावर लाल रंगाची पँट व त्यावर लाल रंगाचा पंजाबी टॉप व त्यावर लाल रंगाचा टीशर्ट घातला आहे. या महिलेबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास खारघर पोलिस ठाणे किंवा पोलिस उपनिरीक्षक एन.एल बेलदार यांच्याशी संपर्क साधावा.

समाजातील प्रत्येक घटकाच्या विकासासाठी प्रशासकीय यंत्रणा प्रयत्नशील : सचिन गोसावी

दै.रायगड नगरी । दिघी

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर समाजातील सर्व घटकांचा सर्वसमावेशक विकास घटनाकारांना अभिप्रेत आहे. समाजातील सर्व घटकांना आपल्या उद्धाराचा प्रगतीचा समतेचा हक्क व अधिकार राज्यघटनेने दिलेला आहे. लोकशाहीतील विविध योजनांची अंमलबजावणी करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणा सदैव सज्ज असते.

योजनांच्या माध्यमातून सर्वसामान्य व्यक्तीच्या विकासासाठी प्रशासकीय यंत्रणा सदैव प्रयत्नशील आहे असे प्रतिपादन तहसीलदार सचिन गोसावी यांनी केले आहे. वावे पंचतन आदिवासी वाडी येथे आयोजित कातकरी उत्थान अभियाना अंतर्गत तहसीलदार सचिन गोसावी यांनी उपस्थितांशी संवाद साधला. व्यक्तीच्या, समाजाच्या उद्धारासाठी प्रयत्नशील राहून काम करत राहणे हे प्रत्येक सुद्धा व्यक्तीचे नैतिक

कर्तव्य आहे. आपण समाजात वावरत असताना आपणास निरंतर दैनंदिन जीवनात विविध अनुभवांना सामोरे जावे लागते. समाजातील आजही हलाखीचे कष्टप्रद जीवन जगणार्या व्यक्तींचे दर्शन घडते. अशा दृश्याने निश्चितच मन हेलावून जाते. आपले प्रत्येकाचे समाजाप्रती काही दायित्व आहे. समाजाच्या दायित्वातून मुक्त होण्यासाठी आपण आपले सामाजिक भान बाळगत सामाजिक ऋणातून उतराई होण्यासाठी सदैव समाज हितासाठी प्रयत्नशील रहावे. सर्वकष विकास साधण्यासाठी आपण समाजातील तळा-गाळातील घटकांना मदत करणे अभिप्रेत आहे.

समाजातील प्रत्येक घटक ज्यावेळी आनंदाने आयुष्य जगेल त्यावेळी निश्चितच आपण आपल्या समाजाच्या ऋणातून उत्तरदायित्वा तून मुक्त होऊ असे सचिन गोसावी यांनी सांगितले आहे. रायगड जिल्हाधिकारी डॉक्टर महेंद्र कल्याणकर व श्रीवर्धन प्रांताधिकारी अमित शेडगे यांच्या मार्गदर्शनाखाली श्रीवर्धन तालुका प्रशासन सर्व शासकीय योजना तळागाळातील घटकांपर्यंत पोचविण्यासाठी कटिबद्ध आहे प्रयत्नशील आहे. सर्वसामान्यांच्या मदतीसाठी महसूल प्रशासन सदैव सज्ज आहे असे सचिन गोसावी यांनी सांगितले आहे. सदर कार्यक्रम प्रसंगी मोफत रेशन कार्ड, सातबारा, उत्पन्न दाखले, वय अधिवास, रहिवासी दाखले, असेसमेंट उतारा यांची वाटप करण्यात आले. सदरच्या कार्यक्रमासाठी, सरपंच प्रमिला मळेकर, मंडळ अधिकारी कल्याण देऊळगावकर, पुरवठा अधिकारी मोरे, रविकांत साखरे, ग्रामसेवक अभय पाटील, तलाठी बाळकृष्ण भामरे, सुदर्शन पालवे, ग्रा पं कर्मचारी, तसेच बहुसंख्येने आदिवासी समाज बांधव उपस्थित होते.

पोलिसांनी पेण पत्रकारांना पुन्हा हरविले

दै.रायगड नगरी । पेण

पेण येथील समाजसेवक दत्ता कांबळे आयोजित भव्य क्रिकेट सामन्यांत झालेल्या उद्घाटनीय सामन्यात पेण पोलिसांनी उत्कृष्ठ खेळ करीत पेण तालुक्यातील पत्रकारांना पुन्हा एकदा पराजित केले. सदर सामन्यांचे उद्घाटन प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, उपविभागीय पो-लीस अधिकारी विभा चव्हाण यांच्या हस्ते झाले.

यावेळी व्यासपीठावर पेण प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार, उपविभागीय पोलीस अधिकारी विभा चव्हाण, वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार, दादर सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील, वक्रतुंड मित्र मंडळाचे संस्थापक दत्ता कांबळे, श्रीमती साधना कांबळे, पेण प्रेस क्लब देवा पेरवी, माजी सरपंच मंगेश पाटील, विनायक पाटील, नारायण पाटील, राज कडू, स्वप्नील पाटील, रोहन पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

उद्घ चषक २०२२ च्या उद्घाटन प्रसंगी नेहमीच जनतेच्या सौरक्षणासाठी तत्पर असलेले पेण पोलीस आणि लेखणीतून जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडणारे पेण पत्रकार यांच्यामध्ये मैत्रीपूर्ण लढत झाली. या लढतीत पत्रकारांनी नाणेफेक जिंकत पोलिसांना फलंदाजी साठी आमंत्रित केले. पोलिसांनी उत्कृष्ठ खेळ करीत सलामीचे दोन्ही खेळाडू नाबाद राहत सहा षटकात ७८ धावा काढल्या. मात्र पेण पत्रकारांची धावा काढताना दमछाक होत, सहा बाद ४० धावां पर्यंतच मजल मारता आली. ५१ धावा काढणाऱ्या वडखळ पोलीस निरीक्षक बाळा कुंभार यांना सामनावीर गौरविण्यात आले. तर दादर सहाय्यक पोलीस निरीक्षक गोविंद पाटील यांनी २२ धावा काढल्या.

चिरनेरच्या पंकज ठाकूरला आयपीएल ड्रीम इलेव्हन टीममध्ये मिळाले ३५ लाखांचे बक्षिस

दै.रायगड नगरी । उरण

कोणाचे नशीब कसे खूलतील हे सांगता येत नाही.चिरनेरच्या अशाच एका क्रिकेट वेड्या तरुणाला सध्या सुरू असलेल्या आय पी एल स्पर्धेने धनवान केले आहे. त्याने लावलेल्या ड्रीम इलेव्हन टीमवर त्याला ३५ लाखांची लॉटरी लागली आहे. जणूकाही भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या चिरनेर गा-वातील श्री महागणपती पंकज ठाकूर या तरुणाला पावला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही.

आयपीएल स्पर्धेत उरण तालुक्यातील चिरनेर येथिल पंकज संतोष ठाकूर या क्रिकेट वेड्या तरुणाने स्पर्धेतील नियमानुसार ऑस्ट्रेलिया व श्रीलंका या दे-शातील येथील खेळाडू घेऊन ऑनलाईन ड्रीम इलेव्हन टीम तयार केली. व ऑनलाईन स्पर्धेत भाग घेतला. ड्रीम इलेव्हन टीम मधिल खेळाडूं केल्यानुसार त्यांना पॉईंट्स देण्यात येतात. ज्याने योग्य टीम तयार करून त्यातील खेळाडूंना जास्त पॉईंट मिळाले की त्या स्पर्धकाला १०० रुपयांपासून १ कोटी रुपयांपर्यंत बक्षीस दिले जाते. त्यानुसार चिरनेरच्या पंकज संतोष ठाकूर या तरुणाला तब्बल ३५ लाख रुपयांचे बक्षिस मिळाले आहे.

चिरनेर गावातील श्री महागणपती मंदिराचे विश्वस्त असलेल्या संतोष नारायण ठाकूर यांचा पंकज हा चिरंजीव असून त्यांनी या अगोदर आपल्या कुटुंबाच व गा-वाच नाव युट्यूबच्या माध्यमातून सातासमुद्रापार भरारी घेऊन सुवर्ण अक्षरांनी लिहून ठेवले आहे. त्यात पंकज ठाकूर यांना ड्रिम इलेव्हन टीमच्या माध्यमातून ३५ लाखाचे पारितोषिक मिळाल्याने सर्वच स्तरातून त्याचे अभिनंदन होत आहे. सामान्य घराण्यातील असलेल्या पंकजने या पैशांचा योग्य विनियोग करण्याचा मानस व्यक्त केला आहे. या अगोदर ही चिरनेर गावातील संकेत विजय मुंबईकर या तरुणाला ड्रिम इलेव्हन टीमच्या माध्यमातून १५ लाखाचे पारितोषिक मिळाल्याने होते.

तळा दिव्यांग संघटनेच्या वतीने नवनिर्वाचित नगराध्यक्षा व नगरसेवकांचा सत्कार

दै.रायगड नगरी । तळा

तळा तालुका दिव्यांग(अपंग) संघटनेच्यावतीने नवनिर्वाचित नगरसेवक नगरसेविकां चा अध्यक्ष किशोर पितळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी नगराध्यक्षा श्रीमती अस्मिता ताई भोरावकर उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे नगरसेविका अर्चना तांबे, पुष्पा नागे, यामिनी म्हेतर, ग्रिष्मा बामणे, माधुरी घोलप, नगरसेवक अविनाश पिसाळ तसेच विजय तांबे, चंद्रकांत भोरावकर शैलेश घोलप, गणेश बामणे कार्यकर्ते संघटनेचे पदाधिकारी सदस्य, प्राथमिक शिक्षण संघटनेचे अध्यक्ष विजय येलवे सर किशोर पाडगे सर उपस्थित होते.

सचिव अमीश भौड सर विजय येलवे सर यांनी उपस्थित नगरसेवक यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी अध्यक्ष किशोर पितळे यांनी पुढील काळासाठी शुभेच्छा दिल्या. तालुका संघटना २०१८ स्थापन झाल्यानंतर प्रथमच सत्कार करण्याची संधी प्राप्त झाली याचा आनंद झाला. तालुक्यात दिव्यांग बांधवाची संख्या मोठ्या प्रमाणात असून नगरपंचायत हद्दीत जवळपास १०० दिव्यांग बांधव आहेत.

शासकीय योजना पासून वंचित आहेत. ५%निधीचा वाटप करण्यात यावा. तसेच ३ डिसेंबर जागतिक दिव्यांग दिनआपल्या स्तरावर करण्यात यावा यासाठी मागणी पत्र पूर्वी सादर केले असून अमंलबजावणी व्हावी. तसेच नगरविकास विभागाचा असणाऱ्या सेवा सुविधा कशा पद्धतीने मिळाल्या जातील यासाठी सहकार्य मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली. यावेळी नगराध्यक्षाच्या वतीने विजय तांबे यांनी दिव्यांग संघटनेने केलेला सत्कार निश्चितच आम्हा मंडळींना बळ देणारा असून दिव्यांगाच्या असणाऱ्या सुविधा आपल्या पर्यत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध आहोत. मग एखादे स्टॉल साठी गाळा उपलब्ध करून देणे, झेरॉक्स मशीन, कॉम्पुटर सेंटर किंवा इतर सोयी देण्यात येतील खा. तटकरे यांच्या कडून संघटनेला मदत करण्याच्या दृष्टीने जरूर प्रयत्न केले जातील असे सांगितले. चंद्रकांत भोरावकर यांनी सत्कार केल्याबद्दल संघटनेला धन्यवाद व आभार व्यक्त केले.

इनरव्हील क्लब कर्जतच्या वतीने मेघा कॅन्सर तपासणी शिबिर

दै.रायगड नगरी । कर्जत

इनरव्हील क्लब ऑफ कर्जत यांच्या विद्यमाने नर्गिस दत्त फाउंडेशन आणि अपोलो कॅन्सर सेंटर यांच्या सहकार्याने कर्जत मध्ये मोफत मेघा कॅन्सर तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

रविवार दि.२० फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते ५ या वेळेत किरवली येथील शेळके मंगल कार्यालयात या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे, या शिबिरात कॅन्सर स्क्रीनिंग प्रोस्टेट स्पेसिफिक ऑटीजन टेस्ट सर्व्हिकल पँप टेस्ट, डोके आणि मान स्क्रीनिंग,सीबीसी रक्त तपासणी, सर्वसाधारण तपासणी, तसेच दमा आणि सीओपीडी साठी चाचणी आणि मोफत औषधे देण्यात येणार आहे अशी माहिती इनरव्हील क्लब कर्जतच्या मोनिका बडेकर यांनी दिली.

मा.पांडे साहेब कोर्ट

अर्जदाराचे वकील
ॲड.सचिन बाबुराव कांबळे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या कोर्टात

क्रिमिनल एम.ए.नं.२०८/२०२२
ने.ता.१९/०३/२०२२

श्री.चार्ल्स एस.आर.डेनियल
वय : ५७ वर्षे, व्यवसाय : नोकरी
रा.अस्पन बिल्डींग रुम नं.सी/३०२/३०३,
अधिराज गार्डन, सेक्टर नं.०५, खारघर,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

पनवेल महानगरपालिका
आरोग्य विभाग, खारघर
ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाला

सदर प्रकरणी जाहीर नोटीस प्रकाशित करणे आवश्यक असल्यामुळे सर्व लोकांस असे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.चार्ल्स एस.आर.डेनियल यांची आई स्व.पी.के.डेनियल हे दि.२३/१२/२०१३ रोजी मयत असल्या कारणाने अर्जदारांच्या आईची मृत्यूची नोंद करून मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. स्व.पी.के.डेनियल रा.अस्पन बिल्डींग रुम नं.सी/३०२/३०३, अधिराज गार्डन, सेक्टर नं.०५, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड येथे त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला असल्याने अर्जदाराने या न्याययलयात स्व.पी.के.डेनियल यांच्या मृत्यूच्या तारखेची नोंद होण्याकरिता पनवेल येथील मे.प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

सदरहून स्व.पी.के.डेनियल ह्या वर नमूद ठिकाणी मयत झालेलया आहेत किंवा कसे हे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीर नोटीसच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात. आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहून मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहून न्यायालय अर्जदार यांच्याकडे लागलीच पुरावा घेवून त्यास सदरहून व्यक्तीचे मृत्यूची नोंद करण्याचे आदेश संबंधितांना देईल.

येणेप्रमाणे ही जाहीर नोटीस आमच्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी आज रोजी दि.१६/०२/२०२२ रोजी दिली.

सही/-
क.लिपीक
फौ.न्याया, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
फौ.न्याया, पनवेल

कोर्ट : मा.सोनवणे साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.हर्षदा गडकर

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१४४/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.०७/०४/२०२२

१) श्री.अहमद रजा अब्दुल सलाम मुल्ला
वय वर्षे : ३६, धंदा : व्यवसाय
२) श्रीमती.मुसरतबानू अब्दुल सलाम मुल्ला
वय वर्षे : ६८, धंदा : गृहिणी
३) शगुफ्ता अब्दुल सलाम मुल्ला
वय वर्षे : ४७, धंदा : गृहिणी
तिघेही रा.फ्लॅट नं.०९/१८, हॅपी हेवन,
सी.एच.एस., दुसरा मजला, सब प्लॉट नं.१८,
निळकंठ गार्डन समोर, बुशरा पार्क,
बावन बंगला, पनवेल, जिल्हा : रायगड
सध्या तिघेही रा.फ्लॅट नं.१०१, सी विंग, पहिला मजला,
निकी टॉवर सी.एच.एस., अंतिम प्लॉट नं.२१०,
इस्त्रायल तलावाजवळ, पनवेल, जिल्हा : रायगड — अर्जदार

वरील अर्जदार क्र.१ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र.२ चे पती अब्दुल सलाम अब्दुल करीम मुल्ला यांचे पनवेल येथे दि.०५/०५/२०१९ रोजी निधन झाले. मयत अब्दुल सलाम अब्दुल करीम मुल्ला यांचे नावे असलेल्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

मिळकतीचे वर्णन

फ्लॅट नं.०९, क्षेत्र ७२५ चौ.फूट बिल्ट-अप, दुसरा मजला, हॅपी हेवन को.ऑपरेटीव्ह हौसिंग सोसायटी, सब प्लॉट नं.१८, फायनल प्लॉट नं.५२४, बुशरा पार्क, पनवेल, जिल्हा : रायगड

वरील फ्लॅट मिळकतीबाबत अर्जदार यांनी वारसाचा दाखला मिळणेबाबत अर्ज दिलेला आहे. तरी वरील वारसाचे दाखल्याबाबत ज्या कोणाचे हक्क, अधिकार, हितसंबंध अशी कोणत्याही प्रकारची तक्रार वगैरे असल्यास तशी लेखी हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत कागदोपत्री पुराव्यासह या मे.कोर्टात दाखल करावी. वरील पद्धतीने कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार यांच्या विनंतीप्रमाणे वारसाचा दाखला देण्यात येईल. त्यानंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज दि.१५ माहे फेब्रुवारी सन २०२२ रोजी माझ्या सहीने व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, पनवेल

मा.सोनवणे साहेब कोर्ट

ॲड.शशिकांत काळू म्हात्रे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३२/२०२२
नि.नं.८/ड
ने.ता.२१/०३/२०२२

१) श्रीमती.गीता संजय पवार
वय : ४८ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.साईबाबा मंदिर जवळ, शिरढोण गाव,
ता.पनवेल, जि.रायगड
२) सौ.श्वेता कृणाल पाटील
वय : २६ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.धाकटा खांदा, ता.पनवेल, जि.रायगड
३) कु.प्रणय संजय पवार
वय : २२ वर्षे, धंदा : नोकरी
रा.साईबाबा मंदिर जवळ, शिरढोण गाव,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार क्र.१ यांचे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील कै.संजय बाळाराम पवार हे दि.२५/०५/२०२१ रोजी मौजे : रिलायन्स हॉस्पिटल, कोपरखैरणे स्टेशन, एम.आय.डी.सी., नवी मुंबई येथे मयत झालेले आहेत. तसेच कै.संजय बाळाराम पवार यांची आई कै.गुलाब बाळाराम पवार ह्या दि.०७/११/२००४ रोजी मौजे : शिरढोण, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत.

कै.संजय बाळाराम पवार यांचे सामाईक मालकीची प्रत्यक्ष ताबेकब्जा आणि वहिवाटीची मौजे : शिरढोण, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत होती व आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र	आकार
शिरढोण	१११	५	०-११-४०	२.२५ रु.पै.
शिरढोण	७९	१/ब	०-४२-०	७.६२ रु.पै.

वर नमूद मिळतीत कै.संजय बाळाराम पवार यांचे वारसदार या नात्याने अर्जदार क्र.१ ते ३ यांचा सदरहू मिळकतीमध्ये हक्क व हितसंबंध निर्माण झालेला आहे. सबब, वर नमूद केलेल्या मिळकतीबाबत कै.संजय बाळाराम पवार यांचा वारसदाखला मिळण्यासाठी अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज पनवेल येथील मे.दिवाणी न्या.वरिष्ठ स्तर यांच्या कोर्टात दाखल केलेला आहे.

सदर वर नमूद केलेल्या मिळकतीस कै.संजय बाळाराम पवार यांचे अर्जदार नं.१ ते ३ हे वारसदार असल्याबाबत अर्जदार यांचे नावाने वारस दाखला देण्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख १६/०२/२०२२ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

मा.मुजावर साहेब यांचे कोर्टात

अर्जदारांतर्फे वकील
शशिकांत आ. म्हात्रे
निलेश द. हातमोडे

जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.१९३८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/०३/२०२२

१) श्री.सागर गोपाळ म्हात्रे
वय : ४२ वर्षे, धंदा : शेती
२) श्री.राजाराम गोपाळ म्हात्रे
वय : ५५ वर्षे, धंदा : शेती
३) सौ.अरुणा नामदेव पाटील
वय : ५७ वर्षे, धंदा : गृहिणी
१ ते ३ रा.मोरावे, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड
४) सौ.रंजना रामचंद्र ठाकूर
वय : ५३ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.रुम नं.२, वरची पाखाडी, आगरी पाडा
कांजुर गाव, मुंबई पुर्व, मुंबई — अर्जदार

विरुद्ध

श्री.संजय गोपाळ म्हात्रे
वय : ४४ वर्षे, धंदा : शेती
रा.मोरावे, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड — सामनेवाले

अर्जदार व सामनेवाले यांची आई कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे ह्या दि.२८/०७/२०१९ रोजी मौजे : मोरावे, पो.वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड येथे मृत्यू पावल्या आहेत. कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे यांचे मृत्यूपश्चात वरील अर्जदार व सामनेवाला हेच त्यांस कायदेशीर वारस आहेत. कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे मौजे : वहाळ, ता.पनवेल येथील खालील वर्णनाची जमीन मिळकती होत्या. सदर जमीन मिळकती नवी मुंबई सिडको प्रकल्पाकरिता संपादीत झाली आहे. खालील नमूद मिळकत ह्या कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे यांस त्यांची आई कै.हिरुबाई भाऊ पाटील म्हणजेच अर्जदार व सामनेवाले यांची आजी हिचेकडून आलेली आाहे. कै.हिरुबाई भाऊ पाटील ह्या दि.२२/०३/२००३ रोजी मौजे : मोरावे, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झाल्या आहेत. त्यांचे मृत्यूपश्चात त्यांचे वारस म्हणून कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे ह्या असून खालील मिळकती वारसाईने आलेल्या आहेत.

कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे यांचे मृत्यूसमयी त्यांचे नावे सामाईक असलेली खालील वर्णनाच्या मिळकती आहेत.

मिळकतीचे वर्णन

मौजे : वहाळ, ता.पनवेल, जि.रायगड

युनिट केस नं.	सर्व्हे नं.	हिस्सा नं.	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
३६०	५०६	२	०-२६-००	४.९०
	२७८	१	०-१०-००	०.३०
	२८१	५	०-११-००	०.३४
	२८५	३	०-०४-०००	०.११
	४४९	६	०-१०-७	२.४४
	४९४	४	०-५२-७	१.५६

येणेप्रमताणे वर्णनाच्या जमीन मिळकती सिडकोने संपादीत केलेल्या असून सिडको तर्फे १२ टक्के योजनेंतर्गत मौजे : उलवे, ता.पनवेल येथे भूखंड खालीलप्रमाणे वाटप करण्यात आलेले आहेत.

मौजे : उलवे, ता.पनवेल, जि.रायगड

गाव	भूखंड क्र.	सेक्टर क्र.	क्षेत्र (चौ.मी.)
उलवे	११४	५	९९२.७७

अर्जदार व सामनेवाले हे वरील मिळकती संदर्भात मयतांचे कायदेशीर वारसदार आहेत. ह्या मिळकतीच्या अर्जावर व सामनेवाले यांच्या हिश्श्याच्या वारस हक्कासंबंधी कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत स्वतः अथवा या मे.कोर्टात प्रत्यक्ष वकीलांमार्फत हजर होवून कागदोपत्री पुराव्यासह हरकती घ्यावयाच्या आहेत. जर या कालावधीमध्ये मुदतीत हरकती न आल्यास मे.कोर्ट श्री.सागर गोपाळ म्हात्रे वगैरे ३ व सामनेवाले ह्यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची कायदेशीर कार्यवाही करेल व अर्जदार व सामनेवाले मयत कै.राधाबाई गोपाळ म्हात्रे यांचे कायदेशीर वारसदार आहेत असा वारस दाखला मंजूर करेल. आज दि.१५/०२/२०२२ रोजी व माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.व.स्तर, पनवेल

संक्षिप्त...

अंगणवाडीमधील ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना गणवेश वाटप

दै.रायगड नगरी । पनवेल

हिंडाल्को इंडस्ट्रीज लि तळोजा या कम्पनी मार्फत csr फंडामधून एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प पनवेल २ ग्रामपंचायत वलप अंगणवाडी मधील ३ ते ६ वर्ष वयोगटातील मुलांना गणवेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी कंपणीचे अधिकारी वर्ग सुधीर मिश्रा, अखिलेश गुप्ता, अमृत आंबूलकर, लहू रोधळ, राजेश पाटील, ग्रामपंचायत सरपंच जयमाला भोलेनाथ पाटील, उपसरपंच मनोज कृष्णा पाटील, सदस्या प्रियांका पाटील, नीलम जोशी, अंगणवाडी पर्यवेक्षिका सविता सांगळे, दीपा मटकर, ग्रामसेविका रेशमा गावंड, गावातील प्रतिष्ठित व्यक्ती, अंगणवाडी सेविका सुषमा गावकर, सपना पाटील, मदतनीस आणि सर्व लाभार्थी पालक वर्ग उपस्थित होते.

म्हसळा येथे संत सेवालाल महाराज जयंती मोठ्या आनंदी आणि उत्साही वातावरणात संपन्न

दै.रायगड नगरी । म्हसळा

संत सेवालाल महाराजांचा जन्म कर्नाटक राज्यात गुत्तीबल्लारी या गावी १५ फेब्रुवारी १७३९ रोजी झाला. या जयंती निमित्त बंजारा समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. म्हसळा तहसील कार्यालय येथून बाजारपेठ मार्गे पाचगाव आगरी समाज सभागृह पर्यंत फार मोठ्या प्रमाणात सेवालाल महाराज यांची मिरवणूक काढण्यात आली.

यामध्ये बंजारा समाजातील लहान थोरांसह मान्यवर समाज बांधवांनी सहभाग घेवून पारंपारिक वेशभूषात संपूर्ण शहरभर सेवालाल महाराजांचा जयघोष केला. या निमित्ताने पाचगाव आगरी समाज सभागृहात संपन्न झालेल्या जयंती सोहळा महोत्सवास म्हसळा तालुका बंजारी समाज अध्यक्ष धेनु चव्हाण, उपअध्यक्ष शंकर चव्हाण, सचिव प्रवीण चव्हाण, खजिनदार देवेंद्र पवार, सीताराम राठोड, महादेव तारु पवार, विश्वनाथ पवार, राजू पवार, रमेश राठोड, भागुबाई चव्हाण, सीताबाई चव्हाण, कुलाबाई राठोड, गो-विंद राठोड, कालूराम राठोड आदि समाज बांधव उपस्थित होते. या प्रसंगी मनोगत व्यक्त करताना समाजाचे अध्यक्ष धेनु चव्हाण यांनी सांगितले की सेवालाल महाराज यांनी बंजारा समाजाच्या प्रगतीसाठी संपूर्ण आयुष्यभर सर्वस्वाचा त्याग करुण समाजाला मान सन्मान प्राप्त करुन दिला. त्यांचा हा त्याग समाजासमोर एक आदर्श असून प्रत्येकांनी त्यांच्या आदेशाच पालन करणे अत्यावश्यक आहे. सर्व समाज बांधवांनी एकत्र येऊन समाजाच्या उन्नतीसाठी आणि प्रगतीसाठी एकसंघ राहण्याचे आवहान धेनु राठोड यांनी केले.

विविध मागण्यासाठी ऑइल फिल्ड एम्प्लॉईज असोसिएशनतर्फे साखळी उपोषण

दै.रायगड नगरी । उरण

विविध मागण्यांच्या पुर्ततेसाठी, कामगारांच्या हिताचे असलेले सोयी सुविधा देण्यास टाळाटाळ करत असल्या बद्दल तसेच मुंबई हायकोर्ट, सुप्रीम हायकोर्ट यांनी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्यास ओ एन जी सी प्रशासन टाळाटाळ करीत असल्याने या अन्याया विरोधात आवाज उठविण्यासाठी ऑइल फिल्ड एम्प्लॉईज असोसिएशन तर्फे संघटनेचे अध्यक्ष शालिग्राम मिश्रा यांच्या मार्गदर्शनाखाली ओ एन जी सी उरण प्लांट, ए पी यु गेट समोर साखळी उपोषण सुरु करण्यात आले आहे. सदर साखळी उपोषण १५ फेब्रुवारी २०२२ पासून सुरु झाले असून जोपर्यंत सर्व मागण्या मान्य होत नाहीत तोपर्यंत हे साखळी उपोषण ओ एन जी सी प्रशासना विरोधात असेच सुरु राहणार असल्याची माहिती उपोषणकर्ते सुनील नाईक यांनी दिली.

मुंबई हायकोर्टने कामगारांना पर्मनंट म्हणून नोकरीत घ्यावे व पर्मनंट नोकरीचे सर्व सेवा सुविधा कामगारांना द्यावेत असे आदेश ओ एन जी सी प्रशासनाला दिले.मुंबई हायकोर्टाच्या १९९६ सालच्या आदेशानुसार ओ एन जी सी प्रशासनाने १/४/१९९७ साली कामगारांना पर्मनंट म्हणून कामावर न घेता 'डायरेक्ट कामगार' म्हणून कामगारांना कामावर घेतले. वास्तविक पाहता कामगारांना पर्मनंट म्हणून नोकरीत सामावून घ्यावे असे न्यायालयाचे आदेश असूनही कामगारांना पर्मनंट म्हणून नोकरीत न घेता त्यांना डायरेक्ट कामगार म्हणून ओ एन जी सी प्रशासनाने त्यांना नोकरीत सामावून घेतले. डायरेक्ट कामगार म्हणून भरती केलेल्या सर्व कामगारांना विविध सेवा सुविधा पासून ओ एन जी सी प्रशासनाने वंचित ठेवले. गेली २४ वर्षे कामगारांना पगारवाढ, मेडिक्लेम, इन्शुरन्स, पेन्शन, ग्रॅज्यूईटी तसेच इतर कोणत्याही सुविधा ओ एन जी सी प्रशासनाने या कामगारांना दिलेल्या नाहीत. या विविध मागण्यासाठी कामगार वर्गांनी संघटनेमार्फत कायदेशीर पत्रव्यवहार करून देखील कामगारांना न्याय मिळाला नाही. ओ एन जी सी प्रशासनाने कामगारांच्या मागण्यांकडे जाणून बुजून दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप साखळी उपोषण करणाऱ्या कामगार वर्गांनी केला आहे. मुंबई विभागा अंतर्गत मुंबई युनिट, पनवेल युनिट, न्हावा युनिट, उरण युनिट, ऑफसर युनिट अशा युनिट मधील १९६ कामगारांवर हा अन्याय चालू आहे.

उपोषणस्थळी सुनील नाईक, निरंजन लवेकर, महेश घरत, तुकाराम पाटील, परवीर गुप्ता, प्रमोद म्हात्रे, जयंत कासारे, मंदार काठे, दिपक कोळी, विजय गमरे, प्रकाश पाटील, रवी म्हात्रे, जयवंत भोईर, जीवन पाटील, मंगेश नाखवा, हरेश थळी, रेखाताई पालकर, भीमाबाई म्हात्रे आदी ऑइल फिल्ड एम्प्लॉईज असोसिएशनचे पदाधिकारी सदस्य, कामगार वर्ग यावेळी उपस्थित होते.

पोलादपूर नगरपंचायतीच्या स्विकृत सदस्यपदी सुरेश पवार व संतोष चव्हाण

दै.रायगड नगरी । शैलेश पालकर

पोलादपूर : पोलादपूर नगरपंचायतीच्या दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीची संपूर्ण प्रक्रिया स्विकृत सदस्य पदांच्या निवडीने पूर्णत्वास गेली असून शिवसेनेकडून शहरप्रमुख सुरेश पवार तर काँग्रेसकडून संतोष चव्हाण यांची निवड करण्यात आली आहे. दोन्ही नवनिर्वाचित स्विकृत सदस्यांनी यापूर्वी लढविलेल्या नगरपंचायतीच्या निवडणुकीमध्ये पराभव पत्करला असून पक्षासाठी दिलेल्या योगदानासाठी निष्ठावंत म्हणून ही निवड झाल्याचे दोन्ही पक्षांच्या नेत्यांकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

काँग्रेसचे उमेदवार सुभाष गायकवाड यांना ११४ मते तर शिवसेनेचे सुरेश पवार यांना १०० मते मिळाली. पण राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित खेडेकर यांना ४१ मते मिळाल्याने सुरेश पवार यांचा पराभव झाल्याचे मानले गेले. दुसऱ्या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये प्रभाग १७ मध्ये दिलीप भागवत यांना ८० मते मिळाली तर शिवसेनेचे शहरप्रमुख सुरेश पवार यांना ७१ मते मिळाली. याठिकाणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष दर्पण दरेकर यांना ४६ मते मिळाली. या निवडणुकीवेळीही शहरप्रमुख सुरेश पवार यांचा केवळ ९ मतांनी पराभव झाला. शिवसेनेचे शहरप्रमुख असलेल्या सुरेश पवार यांना आ.भरत गोगावले यांनी दर्शविलेल्या विश्वासामुळे स्विकृत सदस्यपदी निवड करण्याचे ठरविण्यात आले. यावेळी पोलादपूर शहरामध्ये सर्वात चर्चे ची ठरलेल्या प्रभाग १० मधील लढतीत शिवसेनेचे प्रसाद इंगवले यांनी १२३ मते मिळवून काँग्रेसच्या माजी विरोधीपक्षनेत्या शुभांगी चव्हाण ११० मते यांचा आश्चर्यकारकरित्या पराभव केला. याठिकाणी भाजपचे प्रतीक सुर्वे यांना १३ मते मिळाली. याठिकाणी शिवसेनेचे प्रसाद इंगवले यांना निकटच्या प्रतिस्पर्धी उमेदवार शुभांगी चव्हाण यांच्यापेक्षा १३ मते अधिक मिळाली. मागील पोटनिवडणुकीमध्ये संतोष चव्हाण आणि या पंचवार्षिक निवडणुकीमध्ये झालेल्या शुभांगी चव्हाण यांच्या पराभवामुळे काँग्रेस पक्षाकडून याच कुटूंबाकडे स्विकृत सदस्यपद देण्याचा निर्णय होऊन संतोष चव्हाण यांची निवड करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज चौकातील सार्वजनिक शौचालय गेल्या कित्येक दिवसांपासून बंद

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात सार्वजनिक शौचालय कित्येक महिन्यांपासून बंद आहे. त्यामुळे येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होताना दिसून येत आहे. त्यामुळे हे शौचालय तोडण्याचा घाट पालिकेने घातला आहे का असा संशय व्यक्त केला जात आहे.

१९९८ मध्ये पनवेल नगरपालिका मार्फत या स्वच्छतागृह बांधण्यात आले आहे. पनवेल मध्ये सामान खरेदी करण्यासाठी व इतर कामांसाठी आलेल्या नागरिकांना हे सुलभ शौचालय सोयीचे ठरत होते. मात्र गेल्या कित्येक महिन्यांपासून हे शौचालय बंद ठेवण्यात आले आहे.

पाठीमागे असलेल्या इमारतीतील गाळ्यानसाठी शौचालय तोडण्याचा घाट पालिकेने घातला असल्याचे यानिमित्ताने समोर आले आहे. मात्र नागरिकांचा याला प्रचंड विरोध आहे. गेल्या २३ वर्षांपासून नागरिकांच्या सोयीचे ठरत असलेल्या शौचालय पुन्हा सुरू करावे अशी मागणी नागरिक करत आहेत.

पालिकेच्या वतीने शॉपिंग कॉम्प्लेक्सच्या बाजूला नवीन शौचालय बांधण्यात आले आहे. मात्र ते एका बाजूला असल्याने आणि चौकातील हे शौचालय बंद असल्याने नागरिकांची गैरसोय होत आहे.

कर्जत नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा संपन्न

दै.रायगड नगरी । संजय गायकवाड

कर्जत : कर्जत नगरपरिषदची सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांच्या अध्यक्षतेखाली काल दि.१५ फेब्रुवारी रोजी संपन्न झाली. नगरपरिषद सभागृहात पार पडलेल्या सभेस उपनगराध्यक्ष अशोक ओस-वाल, मुख्याधिकारी डॉ. पंकज पाटील, राहुल डाळींबकर, विवेक दांडेकर, नितीन सावंत, बळवंत घुमरे, उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे,संकेत भासे, हेमंत ठाणगे तर नगरसेविका भारती पालकर, सुवर्णा निलधे, विशाखा जिनगरे, प्राची डेरवणकर,संचिता पाटील, पुष्पा दगडे, मधुरा चंदन,स्वामिनी मांजरे, वैशाली मोरे उपस्थित होते.

सभेच्या प्रारंभी भारतरत्न लता मंगेशकर यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. विषय पत्रिकेवरील पहिला विषय मागील सभेचे कार्यवृत्त वाचून कायम याबाबाबत सर्व नगरसेवकांनी दिलेल्या पत्रा बाबत सात नंबरचा विषय सिक्युरिटी बाबतचा कायम करू नये असे सभागृहात ठरले त्यावर अध्यक्ष जोशी यांनी याबाबत नगरविकास कडून मान्यता घ्यावी लागेल असे सभागृहात सांगितले. कर्जत नगरपरिषद एस ओ डी एफ प्लस प्लस दर्जा प्राप्त करून घेण्यात कमी मागवलेल्या सूचना हरकतींवर विचार करणे हा विषय चर्चेला आल्यावर कर्जत शहरातील सर्वच सार्वजनिक शौचालय यांची अवस्था दयनीय आहे याबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली, स्वच्छ सर्वेक्षण अभियाना अंतर्गत मिळालेली बक्षिसाची रक्कम ही कर्जत शहरातील शौचालय व स्मशानभूमी यांच्यावरच खर्च करावी असे सांगितले. या चर्चेत राहुल डाळींबकर, संकेत भासे,उमेश गायकवाड, सोमनाथ ठोंबरे, अशोक ओसवाल,नितीन सावंत यांनी सहभाग घेतला.

आमराई येथील मैदान भाडे तत्त्वावर देण्याबाबत नगरसेवक राहुल डाळिंबकर यांनी पत्र दिले होते त्याबाबत राहुल डाळींबकर यांनी मैदानाचे काम पूर्ण होऊन एक वर्ष झाले आहे, भाड्याने दिले गेले नाही त्यामुळे वर्षभर नगरपरिषदेचे उत्पन्न बुडाले आहे, तेथील गाळे भाड्याने देऊन नगरपरिषदेच्या उत्पादनावर लक्ष द्यावे असे सांगून सध्या ती वास्तू तशीच पडून असल्याने त्याचे नुकसान होत असल्याचे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले. बळवंत घुमरे यांनी स्थायी समितीत पन्नास हजाराच्या आतिल कामे मंजूर करण्यात आली आहेत, नगरपरिषद मार्फत कामे त्वरित का करण्यात येत नाही, त्यासाठी ठेकेदार शोधण्यासाठी सहा महिन्याचा कालावधी घालवला जातो याबाबत नाराजी व्यक्त केली.

संकेत भासे यांनी दहीवली येथे छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा उभारण्यात कामी मी नगर परिषदेकडे दाखला मागितली होता, या घटनेला चार- पाच महिन्याचा कालावधी झाला मात्र दाखला मला अद्याप मिळाला नाही असा प्रश्न उपस्थित केला, त्यावर नगराध्यक्ष सुवर्णा जोशी यांनी कोणत्याच पुतळ्याला आमचा विरोध नाही मात्र मुख्याधिकारी यांच्याकडून अद्याप पर्यंत मला टिपणी प्राप्त झाली नाही त्यामुळे विषय पत्रिकेवर हा विषय घेतला गेला नाही, टिपणी मिळेल त्या वेळेला पुढच्या सभेत हा विषय विषय पत्रिकेवर घेतला जाईल असे सांगितले.

प्रभागात काही समस्या असल्यास आम्ही नगरपरिषदेच्या संबंधित कर्मचाऱ्याला फोन करतो कर्मचारी फोन उचलत नाही याबाबत सोमनाथ ठोंबरे यांनी नाराजी व्यक्त केली त्यावर मुख्याधिकारी डॉक्टर पंकज पाटील यांनी याबाबत मला नगरसेवकांनी दोन ओळीचे लेखी पत्र दिल्यावर मी संबंधित कर्मचाऱ्यावर त्वरित कारवाई करेन असे सांगितले, प्रभागात असलेल्या समस्यांबाबत स्थानिक नगरसेवक, मुख्याधिकारी, मी स्वतः आणि कर्मचारी प्रत्येक प्रभागात फिरून त्या प्रभागाची पाहणी करू असे नगराध्यक्ष जोशी यांनी सभागृहात सांगितले.

अजित पवार यांच्याकडून नगराध्यक्षा सौ.अस्मिता भोरावकर उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्यासह नगरसेवकांचा सत्कार

दै.रायगड नगरी । तळा

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा उपमुख्यमंत्री अजित पवार रायगड लोकसभा मतदारसंघाचे खासदार सुनील तटकरे आणि रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांच्या प्रमुख उपस्थितीत (दि.१५) तळा नगरपंचायत नवनिर्वाचित नगराध्यक्षा सौ.अस्मिता भोरावकर उपनगराध्यक्ष चंद्रकांत रोडे यांच्यासह सर्व राष्ट्रवादी काँग्रेसचे नगर-सेवक, नगरसेविका यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रायगड जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष सुरेश लाड, आ.अनिकेत तटकरे राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकार यावेळी उपस्थित होते.

यावेळी अजित पवार यांनी मार्गदर्शन करताना सर्वप्रथम विजयी उमेदवारांचे अभिनंदन केले. नवनियुक्त नगरसेवकांची जबाबदारी वाढली आहे. काम करताना कुठे कमी पडलात तर खचून जाऊ नका आणि यश मिळाले तर हुरळून जाऊ नका, असा सल्ला अजित पवारांनी सर्व उपस्थितांना दिला. राज्यात काम करताना दोन वर्ष संकटात गेली. कोरोना, नैसर्गिक आपत्ती अशा सर्व संकटांना सामोरे जाण्याचे काम आपण केले. यामध्ये कोकणात वादळांमुळे झालेले नुकसान भरून काढण्याची राज्य सरकारची भूमिका आहे. कोकण हा निसर्ग सौंदर्याने नटलेला भाग असून पर्यटन विकासावर भर देण्याचा राज्य सरकारचा विचार असल्याचे त्यांनी सांगितले. रेवस ते रेडी हा सागरी मार्ग पूर्ण केल्यानंतर कोकण भागात मोठा बदल घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अनेक नगरपंचायतींमध्ये नवनियुक्त नगर-सेवक आणि नगराध्यक्ष एकाच पक्षाचे प्रतिनिधित्व करत आहेत. आता तुम्ही पक्षाचे नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्ष झालेला आहात. त्यामुळे तुमच्या प्रत्येक कृतीवर लोकांचे लक्ष असते. काही चुकीचे झाले तर त्याचा फटका पक्षालाही बसतो. त्यामुळे याची काळजी घेऊन काम करावे, असे मार्गदर्शन त्यांनी केले.

यावेळी सुनील तटकरे यांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले. राज्यात महविकास आघाडी सरकार काम करत आहे. स्थानिक पातळीवर सत्ता स्थापन करताना एकोपा राखण्याचे काम आपण केले. सर्वांनी यात सामंजस्य दाखवले. सर्वच कार्यकर्त्यांनी यात प्रमुख भूमिका बजावली, यासाठी सर्व कार्यकर्त्यांचे सुनील तटकरे यांनी आभार व्यक्त केले. अजित पवार राज्याचे उपमुख्यमंत्री असताना कोकण रेल्वेचे काम पूर्ण झाले. अशाप्रकारे आता त्यांच्या नेतृत्वात कोकणातील सागरी मार्गाचे काम पूर्ण होईल, असा विश्वास तटकरे यांनी सर्व कार्यकर्त्यांना दिला.

रायगडच्या पालकमंत्री आदिती तटकरे यांनी सर्व विजेत्या उमेदवारांचे अभिनंदन केले. याशिवाय या विजयात कार्यकर्त्यांचा मोलाचा वाटा असल्याने त्यांचेही आभार मानले. या विजयातून स्थानिक विकासकामांना गती देण्याचा प्रयत्न नक्की होईल, असा विश्वास आदिती तटकरे यांनी व्यक्त केला. यापुढे कोकण विभागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रभाव अधिक बळकट करण्यासाठी एकत्र काम करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

तळा नगरपंचायत निवडणूक झाल्यापासून गेल्या पाच वर्षात शिवसेना पक्षाने शहर विकासाला प्राधान्य दिले नाही त्यामुळे शहरातील जनतेने २०२२ च्या नगरपंचायत निवडणुकीत विश्वास दाखवून राष्ट्रवादी काँग्रेसला शहराच्या विकासाची जबाबदारी सोपविली असल्यामुळे काही महिन्यातच शहराच्या विकासासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी आणला जाईल राष्ट्रवादी काँग्रेसकडेच तळा शहराच्या विकासाचे व्हिजन आहे.ग्रामीण भागाचा विकास झालाच आहे. भविष्यात खा.सुनील तटकरे यांच्या कडून निधीचा ओघ सुरु राहणार असल्याचा विश्वास नगराध्यक्षा सौ.भोरवकार उपनगराध्यक्ष रोडे यांच्यासह सर्व नगरसेवक, नगरसेविका यांनी यावेळी व्यक्त केला. कार्यक्रमा दरम्यान पाली म्हसळा दापोली, मंडणगड नगरपंचायत नगराध्यक्ष आणि उपनगराध्यक्षांचाही सत्कार करण्यात आला.

आ.अनिकेत तटकरे यांच्या आमदार निधीतून मंदिरासाठी पाच लाखाच्या निधीचे पत्र

दै.रायगड नगरी । खांब-रोहा

विधान परिषद आमदार अनिकेत तटकरे यांच्या आमदार निधीतून रोहे तालुक्यातील देवकान्हे येथील वाघेश्वर मंदिरास रू.पाच लाख मंजूरीचे पत्र देण्यात आले आहे.

विकास कामाला नेहमीच प्राधान्य देऊन ग्रामीण जीवनाच्या विकासकामासाठी विशेष लक्ष देणारे विधान परिषद आ.अनिकेत तटकरे यांनी आपल्या विकासकामांचा धडाका लावला असून देवकान्हे येथील मंदिरासही त्याच उद्देशाने आपल्या आमदार निधीतून त्यांनी रू.पाच लाखाचा निधी उपलब्ध करून देऊन तशाप्रकारचे मंजूरीचे पत्रही ग्रामस्थांना देण्यात आले आहे.

यावेळी सरपंच वसंत भोईर, सदस्य दयाराम भोईर, भोईर मंडळ अध्यक्ष संतोष भोईर, सचिई किशोर भोईर, येथील कार्यकर्ते दामू भोईर, देविदास भोउर, शशिकांत भोईर, रविंद्र पिंपळकर, मंगेश ठाकूर व अन्य ग्रामस्थ उपस्थित होते. आ.अनिकेत तटकरे यांमात्रच्या आमदार निधीतून वाघेश्वर मंदिरास निधी मिळाल्याने आम्ही ग्रामस्थ त्यांना धन्यवाद देत आहोत. तर खा.सुनील तटकरे, पालकमंत्री आदिती तटकरे यांनीही आम्हाला ग्रा.पं.विकास कामाकरिता मोलाचे सहकार्य करून वेळोवेळी विविध माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला असल्याने व भविष्यातील प्रलंबित विकासकामेही त्यांच्यामुळेच मार्गी लागतील असा आमचा विश्वास होईल. अशा प्रकारची प्रतिक्रिया सरपंच वसंत भोईर यांनी पत्रकारांना दिली आहे.